# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

लोकसभेचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं.

दरम्यान, अमेरिकेने आयात कर लागू केल्याच्या मुद्यावरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज बाधित झालं होतं. आज सकाळी सदनाचं कामकाज सुरु झाल्यावर काँग्रेससह इतर विरोधी पक्ष सदस्यांनी अध्यक्षांसमोर येऊन घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे सदनाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित झालं होतं.

राज्यसभेत पश्चिम बंगालमधल्या शिक्षकांच्या नियुक्तीच्या मुद्यावरुन सत्ताधारी पक्षातल्या सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळे कामकाज आधी दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर पुन्हा एक वाजेपर्यंत स्थगित झालं होतं.

****

संसदेच्या दोन्ही सभागृहात वक्फ संशोधन विधेयक पारित होणं, सामाजिक – आर्थिक न्याय, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेनं एक संधी असल्याचं, पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे. वक्फ व्यवस्थेत गेल्या अनेक दशकांपासून पारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव आहे, ज्यामुळे गरीब मुस्लिम, महिलांच्या हिताचं नुकसान होत असल्याचं, पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही, वक्फ सुधारणा विधेयक ऐतिहासिक असल्याचं म्हटलं आहे. या विधेयकाद्वारे वक्फ मंडळ आणि वक्फ मालमत्ता अधिक उत्तरदायी, पारदर्शक आणि न्याय्य होणार असल्याचं त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.

****

प्रसिद्ध चित्रपट अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक मनोजकुमार यांचं आज सकाळी मुंबईच्या कोकिलाबेन रुग्णालयात निधन झालं, ते ८७ वर्षांचे होते. विशेषतः देशभक्तिपर चित्रपटांमध्ये भूमिका केलेल्या मनोज कुमार यांना भारत कुमार या नावानं ओळखलं जात होतं. चित्रपट क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानासाठी मनोज कुमार यांना दादासाहेब फाळके पुरस्कार, तसंच पद्मश्री पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनोजकुमार यांना श्रद्धांजली वाहिली आहे. तर देशप्रेमाची भावना रुजवणारा महान अभिनेता गमावला असल्याची शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

****

महाराष्ट्र सरकारने उत्तर कर्नाटकात पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी वारणा आणि कोयना प्रकल्पातून कृष्णा नदीत, किंवा उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्याची मागणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं. गेल्या अनेक वर्षांपासून कर्नाटक मधल्या नागरिकांची पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल सिद्धरामय्या यांनी महाराष्ट्र सरकारचे आभार मानले.

****

नांदेड तालुक्यातल्या आलेगाव शिवारात मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात सात मजूर महिलांचा मृत्यू झाला. वसमत तालुक्यातल्या गुंज इथल्या शेतमजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर, आज सकाळच्या सुमारास चालकाचा ताबा सुटल्यानं विहिरीत कोसळला. जिल्हा प्रशासन, नांदेड महापालिका अग्निशमन दल यांच्या वतीने बचाव कार्य करुन तीन मजुरांना बाहेर काढण्यात यश आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

****

लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी काल मॉन्सूनपूर्व आढावा बैठक घेतली. मॉन्सून काळात आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी सज्ज राहण्याची सूचना त्यांनी यावेळी केली. लातूर पाटबंधारे विभाग आणि जिल्हा परिषदेच्या सिंचन तलाव, पाझर तलाव आदी प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून

संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, असंही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

****

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत नांदेड तहसील कार्यालयाच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. याअंतर्गत या कार्यालयाने अनेक सुविधा डिजिटल केल्या असून, विविध ऑनलाईन प्रशासकीय सुविधा, ई-लायब्ररी, सायबर वॉल, तहसिल ॲप, प्रमाणपत्र सेवांचा काल जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते शुभारंभ झाला.

****

बीड शहरातल्या बिंदुसरा नदीच्या पात्रात बंधारा बांधणीच्या कामाला काल सुरूवात झाली. आमदार संदीप क्षीरसागर यांनी या कामाचा शुभारंभ केला. या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यामुळे बीड शहर आणि परिसरातल्या आसपासच्या गावांमध्ये भूजल पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

****

ओडिशात पुरी इथं होत असलेल्या ५७ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघाचे उपांत्य फेरीतले सामने आज होणार आहेत. पुरुष संघाचा सामना ओडिशाविरुद्ध तर महिला संघाचा सामना दिल्ली संघासोबत होणार आहे.

****